रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक २०
www.ramprahar.com

◆ गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## पीएम मोदींचा व्हिडीओ ब्लॉक केल्याबद्दल 'मेटा'चा माफीनामा




**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फेसबुकवरील एक व्हिडीओ काही काळासाठी हटवण्यात आल्याप्रकरणी सोशल मीडिया क्षेत्रातील दिग्गज कंपनी 'मेटा'ने माफी मागितली आहे. कंपनीचे चीफ ग्लोबल अफेअर्स ऑफिसर जोएल कॅपलन यांनी ही तांत्रिक चूक असल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान मोदींनी परीक्षा, पेपरफुटी आणि 'जेन झी' विद्यार्थ्यांना संबोधित केलेल्या या व्हिडीओवर फेसबुकने पाच ते सहा तासांसाठी बंदी घातली होती. संसदीय समितीने या घटनेची अत्यंत गंभीर दखल घेतली. लोकसभा सचिवालयाच्या निर्देशानुसार झुकेरबर्ग यांनी तीन दिवसांत माफी न मागितल्यास त्यांना मिळणारे कायदेशीर संरक्षण काढून घेतले जाऊ शकते, असा इशारा इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयाला दिलेल्या पत्रात देण्यात आला होता. यानंतर अखेर 'मेटा'च्या वतीने कॅपलन यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

### अंतरंग

वाढदिवसानिमित्त जनहिताची परंपरा कायम/२

अल्पवयीन मुलीसोबत अश्लील चाळे; तरुण अटकेत/५

माथेरान भाजप शहराध्यक्षांचे महावितरणला निवेदन/७

# कृषी शिक्षणावर भर द्यावा

■ विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. नार्वेकर यांचे प्रतिपादन

**कर्जत : प्रतिनिधी**

भारत आज जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असून मोठ्या प्रमाणावर कृषी क्षेत्रावर आधारित आहे. सन २०२७पर्यंत तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आणि २०४७पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे आपले उद्दिष्ट आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी शेती आणि शेतकरी अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने नव्या पिढीला



शेतीशी जोडणे काळाची गरज असून राज्यातील शहरी भागातील प्रत्येक शाळेने वर्षातून किमान एकदा विद्यार्थ्यांसाठी कृषी अभ्यास सहलीचे आयोजन करावे, असे आवाहन महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांनी केले.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जत येथे शिक्षण प्रसारक मंडळ मालाड संचलित उत्कर्ष मंदिर विद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी आयोजित शास्त्रज्ञ, शेतकरी व विद्यार्थी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू संजय भावे, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. बी.डी.वाघमोडे, मालाडच्या शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक विजय लेले, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे सदस्य विनायक काशीद, विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. संजय तोरणे, मुंबईच्या स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य अभ्यास मंडळाचे कार्याध्यक्ष स्वप्नील सावरकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अ‍ॅड. राहुल नार्वेकर म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात भारतासमोर अन्नसुरक्षेचे मोठे आव्हान होते, मात्र देशातील शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे आज भारत अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण झाला असून इतर देशांनाही अन्नधान्य पुरवणारा देश म्हणून ओळख निर्माण केली आहे. हे यश केवळ शेतकऱ्यांच्या कष्टामुळे शक्य झाले आहे.

विद्यार्थ्यांसाठी आयोजित कृषी अभ्यास सहल हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. पुस्तके, संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून ज्ञान मिळत असले तरी प्रत्यक्ष अनुभवातून मिळणाऱ्या ज्ञानाची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. विद्यार्थ्यांनी शेतात जाऊन शेती, संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहिल्यास त्यांचे ज्ञान अधिक समृद्ध होईल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास प्राध्यापक, शास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षक, शेतकरी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने यांनी व्यक्त केले.

### विद्यार्थी, शेतकऱ्यांसमवेत भात लागवड

दौऱ्यादरम्यान विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शेतकऱ्यांसमवेत प्रत्यक्ष शेतात भात लागवडीत सहभाग नोंदविला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शेतीविषयी प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण घेण्याचे महत्त्व विषद केले. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रातील कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्राला भेट देऊन तेथील उपक्रमांची माहिती घेतली. भात जलद पैदास (स्पीड ब्रीडिंग) केंद्राची पाहणी करून आधुनिक संशोधन प्रक्रियेची माहिती जाणून घेतली तसेच यांत्रिकी पद्धतीने भात लागवडीच्या प्रात्यक्षिकालाही भेट दिली.

# समाजप्रिय नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजहिताची भूमिका समर्थपणे निभावणारे आणि कार्यसम्राट म्हणून ओळखले जाणारे लोकप्रिय नेतृत्व, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस यंदाही सामाजिक बांधिलकी जपत बुधवारी (दि.५) मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाढदिवसाची सुरुवात गणपती मंदिरात दर्शन घेऊन केली. त्याचप्रमाणे वडील लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आई शकुंतला ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात शुभेच्छा स्वीकारल्या. यावेळी हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर वाढदिवसानिमित्त राज्यातील अनेक मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री सर्वश्री चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, गिरीश महाजन, राधाकृष्ण विखे-पाटील, मंगलप्रभात लोढा, भरत गोगावले, भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, मुंबई अध्यक्ष अमित साटम, आमदार सर्वश्री महेश बालदी, किसन कथोरे, मंदाताई म्हात्रे, महेंद्र थोरवे, सुप्रसिद्ध अभिनेते विजय गोखले यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, कला, क्रीडा, प्रशासकीय, विधी, पत्रकारिता, वैद्यकीय, संगीत, नाट्य, सामाजिक संस्था, संघटना, विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांनी आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अभीष्टचिंतन केले.

### समाजोपयोगी उपक्रमांनी जन्मदिन साजरा



(अधिक छायाचित्रे पान ३,६,८ वर..)

यावर्षीही वाढदिवसानिमित्त जनआरोग्य शिबिर, महारोजगार मेळावा, शैक्षणिक साहित्य वाटप, महिला सक्षमीकरण कार्यक्रम आदी समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आले. या उपक्रमांद्वारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी जनतेप्रति असलेली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

महापौर नितीन पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत जाणीव एक सामाजिक संस्थेच्या वतीने ऋतू हिरवा संगीतमय कार्यक्रम, के.एन. गुजर हॉस्पिटलतर्फे कराड येथे आरोग्य तपासणी, रक्तदान, नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नादब्रह्म साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संगीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी ज्येष्ठ गायिका शुभदा पराडकर यांचे मार्गदर्शन, जयेंद्रशेठ जोशी युवा मंच आणि रविशेठ जोशी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे येथे समाजोपयोगी वस्तूंचे वाटप, नगरसेविका दर्शना भोईर यांच्या संयोजनाखाली व्हिजन फ्रेंड, साकीब गोरे यांच्या सहकार्याने 'देवाभाऊ चष्मा' या उपक्रमांतर्गत गरजू तिथे चष्मा आणि मोतीबिंदू निवारण जनआरोग्य शिबिर, नगरसेवक रवींद्र भगत यांच्या वतीने कळंबोलीत आरोग्य शिबिर, आभा व आयुष्यमान कार्ड, विद्यार्थ्यांचा सत्कार व वह्यावाटप तसेच विकासकामांचे उद्घाटन, नगरसेवक विजय खानावकर यांच्या वतीने कळंबोलीत जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना बॅग वाटप, नागरिकांसाठी नेत्र तपासणी व चष्मे वाटप तसेच हायमास्ट दिव्यांचे उद्घाटन, शिवसेना शहरप्रमुख तुकाराम सरक, नगरसेविका सायली सरक व शिवसेना कळंबोली शहराच्या वतीने वृक्षदिंडी, वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. **(पान २ वर..)**

# समाजाची जाणीव असणे महत्त्वाचे -लोकनेते रामशेठ ठाकूर



### ऋतू हिरवा सांस्कृतिक कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजाची जाणीव आपल्याला असणे हे महत्त्वाचे आहे आणि त्या दृष्टिकोनातून जाणीव एक सामाजिक संस्था समाजाची, गोरगरिबांची सेवा करण्याचे काम करत आहे, असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी येथे काढले.

भाजप प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जाणीव एक सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित ऋतू हिरवा हा सांस्कृतिक कार्यक्रम मंगळवारी फडके नाट्यगृहात उत्साहात झाला. त्यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

कार्यक्रमाचे आयोजन महापौर तथा 'जाणीव'चे संस्थापक अध्यक्ष नितीन पाटील यांच्यातर्फे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या. **(पान २ वर..)**

## अभिनेते प्रदीप रावत यांचे निधन




**मुंबई :** 'लगान', 'गजनी' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमधील आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते प्रदीप रावत यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७४व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते गेल्या काही काळापासून कर्करोगाने ग्रस्त होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

रावत यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात प्रसिद्ध महाभारत मालिकेतून केली होती. त्यांनी बॉलीवूडच नव्हे तर दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला.

# केंद्रीय मंत्री गडकरींशी संबंधित बदनामीकारक मजकूर त्वरित हटवा!

## हायकोर्टाचे आदेश



**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांची बदनामी करणारे तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) गैरवापर करून तयार केलेले डीपफेक व्हिडीओ आणि आक्षेपार्ह मजकूर सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून तातडीने हटवण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी (दि.५) दिले.

केंद्र सरकारच्या इथेनॉल-मिश्रित पेट्रोल (ई-२०) कार्यक्रमाशी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि त्यांच्या कुटुंबाचा खोटा संबंध जोडून त्यांची सामाजिक प्रतिमा मलिन केली जात होती. याविरोधात ना. गडकरी यांनी सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या सामग्रीविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. गुगल, एक्स (ट्विटर), मेटा आणि यूट्यूब यांसारख्या प्रमुख डिजिटल व्यासपीठांवर ई-२० इंधन योजनेवरून गडकरी यांच्या संमतीशिवाय त्यांचे नाव, प्रतिमा, चेहऱ्याची ठेवण आणि आवाजाची नक्कल करून एआय-निर्मित बनावट मजकूर प्रसारित केला जात होता. या आक्षेपार्ह सामग्रीच्या प्रसारावर कायमस्वरूपी बंदी घालण्याची आणि ही सामग्री प्लॅटफॉर्मवरून हटवण्याची मागणी त्यांनी याचिकेद्वारे केली होती.

या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्तींनी प्रसारित करण्यात आलेला मजकूर अत्यंत बदनामीकारक, घृणास्पद आणि द्वेषपूर्ण असल्याचे निरीक्षण नोंदवले. अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या सामग्रीला सार्वजनिक व्यासपीठांवर स्थान असू शकत नाही, असे नमूद करत उच्च न्यायालयाने मेटा आणि गुगल एलएलसी या कंपन्यांना गडकरी यांच्या अर्जात नमूद केलेला सर्व बदनामीकारक मजकूर हटवण्याचे स्पष्ट आदेश दिले. याशिवाय भविष्यातही ना. गडकरी यांच्याविरोधात असा कोणताही डीपफेक किंवा एआय-निर्मित मजकूर आढळल्यास तक्रार प्राप्त होताच संबंधित कंपन्यांनी त्यावर त्वरित कारवाई करावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जनहिताची परंपरा कायम

## कराडमध्ये आरोग्यासह विविध समाजोपयोगी उपक्रम

**सातारा : रामप्रहर वृत्त**

सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविणारे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सातारा जिल्ह्यातील कराड येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. जी. के. गुजर चॅरिटेबल ट्रस्ट आणि के. एन. गुजर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमांमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप, शालेय साहित्य वितरण तसेच जिजाऊ वसतिगृहात अन्नदान असे विविध उपक्रम राबविण्यात आले.



आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस ५ ऑगस्ट रोजी असल्याने त्यानिमित्त जी. के. गुजर चॅरिटेबल ट्रस्टचे व्हाईस चेअरमन इंद्रजीत गुजर आणि विरेंद्र गुजर यांच्या पुढाकारातून या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिनिधी म्हणून स्वीय सहाय्यक तथा पनवेल महानगरपालिकेचे माजी आरोग्य सभापती उमेश पोद्दार यांनी उपस्थित राहून शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी इंद्रजीत गुजर, विरेंद्र गुजर, हनुमंत कुंभार, ट्रस्टच्या सचिव माधुरी गुजर, प्राचार्य अन्वर मुल्ला, विशाल पाटील, गजानन भिसे यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात नागरिकांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी करण्यात आली. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. नेत्रतपासणीनंतर गरजू लाभार्थींना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याच परंपरेचा भाग म्हणून यंदाही समाजातील गरजू घटकांपर्यंत आरोग्यसेवा आणि सामाजिक मदत पोहोचविण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला.

'निरोगी समाज हीच खरी संपत्ती' या भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत २८० रक्तदात्यांनी रक्तदान केले, तर ५०४ गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण आणि जिजाऊ वसतिगृहात अन्नदान करून वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

## सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोट वाटप




**खारघर : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल पालिकेच्या प्रभाग क्र. ३मधील सफाई कर्मचाऱ्यांना विनोद घरत यांच्याकडून रेनकोटचे वाटप करण्यात आले. पावसाळ्यात अहोरात्र सेवा देणाऱ्या स्वच्छतादूतांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला.

यावेळी भाजप उत्तर रायगड उपाध्यक्ष वासुदेव घरत, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, प्रभाग ३ अध्यक्ष जगदीश घरत, कुणाल गायकवाड, युवा मोर्चा जिल्हा सचिव शुभम पाटील, उत्तर पनवेल महिला उपाध्यक्ष मनीषा तळवडकर, सरचिटणीस सुनीता देशमुख, चिटणीस प्रिया हनुमंते, महिला प्रभाग अध्यक्ष सोनल लाहा, युवा मोर्चा अध्यक्ष विशाल घरत, नितीन म्हात्रे, प्रमोद पाटील, केशव गायकर, लुकमान शेख, माणिक म्हात्रे, रोशन घरत, सुमित गोंधळी, निशांत रीळकर, कैलास वावंजेकर, प्रमोद तळवडकर, रितेश राजगुरू, रवी म्हात्रे, पवन भोईर आदी उपस्थित होते.

## करंजाडे जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या वाढदिवशी विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांना शुभेच्छा दिल्या. याच पार्श्वभूमीवर करंजाडे येथील जिल्हा परिषद शाळेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून त्यांचा शैक्षणिक आनंद द्विगुणित करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी करंजाडे गावचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, सदस्य अतिष साबळे, माजी सदस्य नाथा भरवाड, भाजप करंजाडे शहर महिला अध्यक्षा सुषमा मयेकर तसेच उमेश भोईर, केतन आंग्रे, ओमकार चौधरी यांच्यासह इतर मान्यवर, ग्रामस्थ आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीस अभिजित जाधव, सत्यवान नाईकांकडून ५१ हजारांचा धनादेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त बॅनर, होर्डिंग्ज, पुष्पगुच्छ, केक तसेच इतर अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी कार्यासाठी योगदान देण्याचे केलेले आवाहन नागरिक, कार्यकर्ते आणि हितचिंतकांकडून उत्स्फूर्तपणे अमलात आणले जात आहे.

या आवाहनाला प्रतिसाद देत अभिजित जाधव आणि सत्यवान नाईक यांच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५१ हजार रुपयांचा धनादेश आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. वाढदिवसानिमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून तो गरजू आणि समाजाच्या हितासाठी उपयोगात आणणे हीच वाढदिवसाची खरी भेट असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहचतो तसेच सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होते, असेही यावेळी सांगण्यात आले. वाढदिवस साजरा करताना अनावश्यक खर्चाला फाटा देऊन रक्तदान, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, स्वच्छता मोहीम तसेच गरजू नागरिकांना मदत अशा समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देण्याचे आवाहनही करण्यात आले.

## रिटघर येथील शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा, रिटघर येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमास ग्रुप ग्रामपंचायत दूंदरेचे सदस्य प्रलय भोपी, ग्रामस्थ राजेश भोपी, राजन भगत, शाळेचे मुख्याध्यापक विजय रेवस्कर, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

पान १ वरुन

## समाजप्रिय नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या वतीने एनसीएमसी कार्ड शिबिर, आरपीआयचे पनवेल महापालिका जिल्हा क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या वतीने पॅनकार्ड व आधार कार्ड शिबिर, नगरसेवक गणेश कडू यांच्या वतीने पनवेल महापालिकेच्या व इतर शाळांना थोर समाजसुधारक यांच्या जीवनावरील दोन हजार पुस्तके वाटप कार्यक्रम, मेसर्स एस.पी. घरत कन्स्ट्रक्शन व काळुंद्रे भाजपच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, प्रभाग १९ भाजपच्या वतीने स्वच्छता मोहीम तसेच वृक्षारोपण, करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप असे विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले.

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी विकासात्मक दृष्टिकोन, समाजाभिमुख उपक्रम आणि लोकसहभागाला दिलेले प्राधान्य सातत्याने महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मतदारसंघाचा चेहरामोहरा विकासात रूपांतरित झाला. त्या अनुषंगाने पनवेल परिसरातील शहरी तसेच ग्रामीण विकासाला नवे परिमाण प्राप्त झाले आहे. सर्वसामान्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठीची त्यांची तळमळ तसेच प्रत्येक प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी ते करत असलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा ही जनतेप्रति असलेली त्यांची निष्ठा अधोरेखित करणारी बाब आहे.

विकासकामांसोबतच सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यासाठी सातत्याने कार्यरत राहणे, विविध विकासकामांचा नियमित आढावा घेणे आणि प्रशासनाकडे प्रभावीपणे पाठपुरावा करणे यामुळे त्यांची ओळख एक कर्तव्यदक्ष, कार्यक्षम आणि जनतेशी सदैव जोडलेला लोकप्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. अत्यंत धावपळीची दिनचर्या असूनही मतदारसंघातील नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव उपलब्ध राहण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. विकासाची दूरदृष्टी, जनसेवेची तळमळ आणि लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्य प्रेरणादायी असल्याने वाढदिवशी महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभीष्टचिंतनाचा वर्षाव झाला.

## समाजाची जाणीव असणे महत्त्वाचे -लोकनेते रामशेठ ठाकूर

अनघा मोडक यांची संकल्पना आणि निवेदन असलेल्या या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे केवळ पाऊसगाणीच नव्हे, तर पावसाच्या विविध २२ रूपांचा अनोखा अनुभव रसिकांना घेता आला. पावसाळ्याशी संबंधित विविध छटा आणि भावनांवर आधारित संगीताचा हा प्रवास उपस्थितांसाठी अत्यंत मनमोहक ठरला. कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला होता. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक आणि कलाप्रेमींनी उपस्थिती लावली.

या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते अॅड.प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेवक अजय बहिरा, सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, मनोज भुजबळ, नगरसेविका दर्शना भोईर, कुसुम पाटील, प्रिती जॉर्ज, रूचिता लोंढे, प्रियांका कांडपिळे, डॉ. अस्मिता घरत, अॅड. शिवानी घरत, शहर उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस अमीर ओझे, रूपेश नागवेकर, उमेश इनामदार, सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन यांच्यासह पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

पनवेल आणि परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागाने वाढदिवस सोहळा आणि सांस्कृतिक संध्याकाळ अत्यंत संस्मरणीय ठरली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांचा सत्कार करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.




## पनवेलच्या विकासासाठी सातत्याने काम करू -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनतेने दाखवलेला विश्वास आणि दिलेल्या आशीर्वादांमुळेच सत्तेची संधी मिळाली असून या सत्तेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या चेहऱ्यावर समाधान आणण्यासाठी आणि पनवेलचा विकास करण्यासाठी सातत्याने काम करीत राहणार, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि. ५) कळंबोली येथे बोलताना दिली.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी कळंबोली शहर मंडळ आणि नगरसेवक रवींद्र भगत यांच्या पुढाकाराने बुधवारी विविध सामाजिक व लोकोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोफत आरोग्य शिबिर, आभा कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड वाटप शिबिर, कळंबोली येथील जिल्हा परिषद शाळेत बक्षीस वितरण व वह्यांचे वाटप तसेच कळंबोली गावातील यूपीसी सेंटर ८च्या स्थलांतरित आरोग्य केंद्राचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून सर्वांना शुभेच्छा दिल्या आणि वाढदिवसानिमित्त अशा स्तुत्य उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी सभागृह नेते व नगरसेवक परेश ठाकूर, कळंबोली शहर अध्यक्ष नगरसेवक अमर पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक रवींद्र भगत, अजय बहिरा, शशिकांत शेळके, दशरथ म्हात्रे, पनवेल शहर अध्यक्ष नगरसेवक सुमित झुंझारराव, नगरसेविका सीता पाटील, सरस्वती काथारा, मोनिका महानवर, दमयंती भोईर, प्रतिभा भोईर, अरुणा पाटील, बायजा बारगजे, कौशिक शहा, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, प्रमोद भिंगारकर, दिलीप बिष्ट, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, निलेश भोईर यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीसाठी अभीष्टचिंतन केले.



**रोहा : भाजप रोहा तालुकाध्यक्ष महेश ठाकूर यांच्या वतीने पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पालेखुर्द राजिप प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी महेश ठाकूर, शिक्षक दिसले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शुभ्रा ठाकूर, सायली झोलगे तसेच सर्व कमिटी सभासद उपस्थित होते.**

# वाढदिवस अभीष्टचिंतन...!



































## संपादकीय

# सुयोग्य कारवाई

राज्यात पनीरच्या नावाने विकल्या जाणाऱ्या ॲनालॉग पनीर म्हणजे दुधाशिवाय अन्य घटकांपासून बनवलेल्या पनीरवर राज्य सरकारने एक वर्षासाठी बंदी घातली आहे. या अशा स्वरुपाच्या पनीरच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर ही बंदी लागू असणार आहे. राज्य सरकारचा हा निर्णय म्हणजे जनतेच्या आरोग्याच्या रक्षणासाठी अन्नभेसळीविरोधात उचललेले एक ठोस पाऊल म्हटले पाहिजे.

**ॲनालॉग पनीर म्हणजे दुधाऐवजी वनस्पतीजन्य तेल, स्टार्च आणि इतर कृत्रिम घटक वापरून तयार करण्यात येणारे पनीर. राज्याचे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या ॲनालॉग पनीरवरील बंदीचा आदेश जारी केला असून ग्राहकांची दिशाभूल करणारी कोणतीही कृती अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन मानली जाईल असे अन्न व औषध प्रशासनाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे. ॲनालॉग पनीर हे दुधापासून बनवलेल्या पनीरसारखेच दिसत असले तरी त्याच्या सेवनामुळे शरीरातील काही अवयवांवर गंभीर परिणाम होऊ शकतात. पचनाच्या समस्या, पोटदुखी, श्वसनाच्या समस्या किंवा त्वचाविकार यांसारखे त्रास त्यातून बळावू शकतात असे वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अन्न व औषध प्रशासनाला एप्रिल 2025 ते मार्च 2026 या कालावधीत अनेक ठिकाणी ग्राहकांची फसवणूक करत ॲनालॉग पनीर हे पनीर म्हणून विकले जात असल्याचे आढळून आले होते. अनेक हॉटेले, रेस्टॉरंट्स आणि केटरिंग व्यावसायिक स्वस्त असल्यामुळे ॲनालॉग पनीरचा वापर करत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. ग्राहकांना आपल्याला नेमके काय खायला दिले जात आहे हेच कळत नव्हते. त्यामुळे आता राज्य सरकारने थेट बंदीचा मार्ग स्वीकारून ग्राहकांच्या आरोग्याला प्राधान्य दिले आहे ही अतिशय योग्यच कारवाई आहे. मात्र आता अन्नसुरक्षेच्या प्रश्नाकडे केवळ बनावट पनीरपुरते पाहता कामा नये. भारत आज लठ्ठपणा आणि नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज या नव्या आरोग्यसंकटांना सामोरा जात आहे. वैद्यकीय संशोधनानुसार भारतातील प्रौढांमध्ये नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीजचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असून लठ्ठपणासोबत मधुमेह आणि हृदयविकाराच्या रुग्णांची संख्याही सातत्याने वाढत आहे. या सर्व आजारांच्या मुळाशी अतिप्रक्रिया केलेले पदार्थ, ट्रान्सफॅट, साखर आणि मीठ यांचे वाढते सेवन हा मोठा घटक आहे असे दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक वेळा संतुलित आहार, योग, फिटनेस आणि लठ्ठपणाविरोधी जनजागृतीवर भर दिला आहे. केवळ उपचारांवर खर्च करण्यापेक्षा प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा अधिक प्रभावी ठरते असा संदेश केंद्रसरकार सातत्याने देत आहे. आपल्या तरूणपिढीपर्यंत हा संदेश नेण्याची मोठी गरज आहे. त्याकरिता जंक फूडविरोधात व्यापक जनजागृती मोहीम उभी करणे आवश्यक आहे. शाळांच्या परिसरात मिळणाऱ्या अतिप्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांवर नियंत्रण, खाद्यपदार्थांवर पोषणमूल्याचे लेबलिंग, भेसळ करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई, नियमित तपासण्या आणि ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. आरोग्यदायी पर्याय सहज उपलब्ध करून देतानाच दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर नियंत्रणही आवश्यक आहे. बनावट पनीरवरील बंदी ही एका मोठ्या आरोग्यक्रांतीची सुरुवात ठरली पाहिजे. राज्य सरकारने ग्राहकांच्या हितासाठी घेतलेला बंदीचा हा निर्णय स्वागतार्ह आहेच. याच धर्तीवर आता जंक फूडविरोधात व्यापक मोहीम उभारली तर भारत अधिक निरोगी आणि सक्षम राष्ट्र बनण्याच्या दिशेने ते मोठे पाऊल ठरेल.**

# वन्यजीव जगतील तरच मानवी जीवन वाचणार!

पृथ्वीवरील प्रत्येक जीव आपल्या स्वतंत्र अस्तित्वाने आणि वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेद्वारे नैसर्गिक समतोल राखण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतो. अन्नसाखळीतील प्रत्येक घटक आवश्यक आहे, कारण एखाद्या एका जीवाचेही असंतुलन संपूर्ण परिसंस्थेवर परिणाम करू शकते. आजच्या काळात मनुष्याला वगळता इतर सर्व जीव निसर्गसंवर्धनात आपली भूमिका पार पाडत आहेत. स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि पुरेसे अन्न हे सर्वांच्या जीवनासाठी आवश्यक असून ते फक्त पर्यावरण निरोगी आणि संतुलित असेल तरच उपलब्ध होऊ शकते. सूक्ष्मजीव माती सुपीक बनवतात, तर पक्षी आणि वन्यप्राणी बियांचा प्रसार करून नवीन वनस्पती व जंगलांच्या वाढीस मदत करतात. जंगलातील जीव सुरक्षित राहिले तर जंगल हिरवेगार राहते, ऋतुचक्र संतुलित राहते, जलस्रोत सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते. त्यामुळे प्रदूषण कमी होते, रोगांचा धोका घटतो आणि जीवनमान अधिक चांगले होते. प्रत्यक्षात वन्यजीव हे निसर्गाचे खरे रक्षक आहेत, कारण पर्यावरणीय समतोल राखण्यात त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. मनुष्याशिवाय निसर्ग स्वतःला पुन्हा वेगाने सावरू शकतो, परंतु निसर्गाशिवाय मानवजीवनाची कल्पनाही अशक्य आहे. त्यामुळे निसर्ग आणि वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली सर्वात मोठी जबाबदारी आहे.

प्रत्येक सजीवाला आपल्या नैसर्गिक अधिवासात जगण्याचा अधिकार आहे, मात्र गेल्या काही दशकांमध्ये वाढलेल्या मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या संघर्षात दोघांनाही जीवितहानीचा सामना करावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळात राजे-महाराजे आणि इंग्रजांनी मोठ्या प्रमाणावर शिकार केल्यामुळे अनेक वन्यप्राण्यांची संख्या अत्यंत कमी झाली. अनेक प्रजाती कायमस्वरूपी नामशेष झाल्या. वन्यजीवांची झपाट्याने घटणारी संख्या रोखण्यासाठी सरकारने विविध कायदे केले आहेत. आयआयटी बॉम्बे आणि सस्त्रा विद्यापीठातील संशोधकांच्या संशोधनानुसार २०१५ ते २०१९ या कालावधीत देशात प्रत्येक एक चौकिमी जंगलवाढीच्या बदल्यात सुमारे १८ चौकिमी जंगल नष्ट झाले. नैसर्गिक, दाट आणि जुनी जंगले झपाट्याने नाहीशी होत आहेत. हीच परिस्थिती कायम राहिली तर त्या जंगलांमध्ये राहणाऱ्या वन्यजीवांचे अस्तित्व गंभीर संकटात येईल.



देशात वाढत्या शहरीकरणामुळे पारंपरिक शेती कमी होत आहे. शहराजवळच्या खेडोपाडी काँक्रीटची जंगले उभी राहत असून नैसर्गिक जंगले आकुंचन पावत आहेत आणि मानवी हालचाली सातत्याने वाढत आहेत. जंगलाजवळ निसर्गाच्या सानिध्यात फार्महाऊस उभारण्याचा कल वाढला आहे. विकासाच्या नावाखाली जंगलातून महामार्ग बांधले जात आहेत तसेच जंगलतोड करून उत्खनन सुरू आहे. यामुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास थेट नष्ट होत आहेत आणि वर्षानुवर्षे नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे.

ज्या जंगलांमध्ये वाघ राहतात, तेथील परिसंस्था अधिक समृद्ध आणि संतुलित असते. वाघ हा केवळ एक वन्यप्राणी नसून संपूर्ण जंगलाचा संरक्षक आहे. त्याच्या अस्तित्वासाठी विशाल, सुरक्षित आणि मानवी हस्तक्षेपापासून मुक्त अधिवास आवश्यक असतो. अशा अधिवासांचे संरक्षण केल्याने असंख्य वन्यप्राणी, वनस्पती, सूक्ष्मजीव आणि संपूर्ण जैवविविधता सुरक्षित राहते. वाघ शाकाहारी प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवतो, त्यामुळे वनस्पतींचा अतिवापर टळतो आणि नैसर्गिक समतोल अबाधित राहतो. सुरक्षित जंगले अधिक प्रमाणात कार्बन शोषून घेतात आणि हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यास मदत करतात तसेच दाट जंगले पावसाच्या पाण्याचा प्रवाह नियंत्रित करून पुराची तीव्रता कमी करतात आणि कोट्यवधी लोकांना गोड्या पाण्याचा पुरवठा करतात. त्यामुळे वाघ आणि त्यांच्या अधिवासाचे संरक्षण म्हणजे संपूर्ण पर्यावरणाचे संरक्षण होय. हे संरक्षण मानवजीवन, शेती, जलस्रोत आणि भावी पिढ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे.

दरवर्षी २९ जुलै रोजी "आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन" साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश संकटग्रस्त मोठ्या मांजरांच्या प्रजाती आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाच्या संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा आहे. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे. "वाघ वाचवा, जंगल वाचवा, निसर्ग वाचवा" हा संदेश याच कारणासाठी दिला जातो, कारण वाघ टिकले तरच आपणही सुरक्षित राहू. ही बाब प्रत्येकाने समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ग्लोबल टायगर फोरमच्या माहितीनुसार जगभरातील जंगलांमध्ये केवळ ५,६६० वाघ शिल्लक आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या "भारतातील वाघांची स्थिती: सह-भक्षक आणि भक्ष्य २०२२" या अहवालानुसार त्यापैकी ३,६८२ वाघ भारतात आढळतात. दरवर्षी रस्ते अपघात, शेतांमधील विजेचा धक्का, उघड्या विहिरीत पडणे आणि अवैध शिकारीमुळे असंख्य वन्यजीवांचा अकाली व दुर्दैवी मृत्यू होतो. विदर्भ (महाराष्ट्र) येथील वृत्तपत्रांमध्ये विशेषतः वाघांच्या मृत्यूच्या घटना वारंवार प्रसिद्ध होत असतात. सातत्याने वाढणारे वाघांचे मृत्यू हे गंभीर चिंतेचे कारण आहे. गेल्या सहा महिन्यांत महाराष्ट्रात २४ वाघांचा मृत्यू झाला आहे तसेच २०२५ मध्ये मध्य प्रदेशात ५४ वाघांचा, तर महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रात ४१ वाघांचा मृत्यू झाला.

वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर यांच्या माहितीनुसार प्रत्येक वाघाच्या अंगावरील पट्ट्यांचा नमुना वेगळा असतो, जसा प्रत्येक माणसाच्या बोटांच्या ठशांचा नमुना वेगळा असतो. मादी वाघीण आपल्या पिल्लांशी संवाद साधण्यासाठी कानामागील पांढऱ्या खुणांचा संकेत म्हणून वापर करते. जगातील निम्म्याहून अधिक वाघ भारतात आढळतात, ही आपल्या देशाच्या समृद्ध जैवविविधतेची मोठी साक्ष आहे. वाघ गुरगुरणे, डरकाळी फोडणे, कण्हणे, फुत्कार काढणे आणि धापा टाकण्यासारख्या विविध आवाजांद्वारे संवाद साधतात. शास्त्रज्ञांच्या मते वाघ सुमारे २० लाख वर्षांपासून पृथ्वीवर अस्तित्वात आहेत, मात्र गेल्या शंभर वर्षांत मानवी हस्तक्षेप, जंगलतोड आणि अवैध शिकारीमुळे त्यांच्या संख्येत सुमारे ९७ टक्क्यांची घट झाली आहे. त्यामुळे त्यांना संकटग्रस्त प्रजाती मानले जाते. आजही अवैध शिकार हा त्यांच्या अस्तित्वासमोरील सर्वात मोठा धोका आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर आशियामध्ये त्यांच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत आहे. २०१६मध्ये काही भागांत वाघांची संख्या वाढल्याची नोंद झाली असली, तरी दक्षिण-पूर्व आशियात त्यांची संख्या अजूनही घटत आहे.

मनुष्यासारख्या बुद्धिमान प्राण्याकडे आज कायदेशीर अधिकार, प्रगत तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, शासनव्यवस्था, न्यायव्यवस्था, सोशल मीडिया, नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाज असे अनेक आधार उपलब्ध आहेत. तरीसुद्धा उच्चशिक्षित आणि जागरूक असूनही अनेक प्रसंगी माणूस स्वतःला असहाय्य आणि फसवला गेल्यासारखे अनुभवतो. स्वतःच्या समस्यांच्या निराकरणासाठी सरकारी कार्यालये, लोकप्रतिनिधी आणि न्यायालयांचे उंबरठे झिजवूनही अनेकदा त्याला समाधानकारक न्याय मिळत नाही. पावसाळ्यात पूर, उन्हाळ्यात दुष्काळ, उष्णतेची लाट आणि पाण्याची टंचाई, हिवाळ्यात धुके, हायपोथर्मिया तसेच विविध नैसर्गिक आपत्ती अशा संकटांना मानवालाही सामोरे जावे लागते. सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असूनही जर माणूस अशा परिस्थितीत हतबल होत असेल, तर त्याच्या तुलनेत वन्यप्राण्यांची अवस्था किती कठीण असेल, याची कल्पनाही करणे अवघड आहे.

क्षणभर मुक्या वन्यजीवांच्या दृष्टीकोनातून विचार करून पाहूया. त्यांना माणसाकडून कोणतीही अपेक्षा नसते. त्यांना केवळ निसर्गाकडून अन्न आणि पाण्याची गरज असते. मानवी हस्तक्षेप नसल्यास निसर्ग सर्व सजीवांचे पालनपोषण करण्यास पूर्णपणे सक्षम आहे. मग आपणच वन्यजीवांना त्रास देत आहोत का? की वन्यजीव आपल्याला त्रास देत आहेत? वाढत्या मानववन्यजीव संघर्षाला नेमके जबाबदार कोण? या प्रश्नांचा वेळेवर, संवेदनशीलतेने आणि सखोलपणे विचार करणे आज अत्यंत आवश्यक आहे. वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. जंगलांचे संवर्धन, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण, अवैध शिकारीला आळा, पर्यावरणपूरक विकास आणि निसर्गाविषयी संवेदनशील दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय मानव आणि वन्यजीव यांच्यातील समतोल कायम राहू शकणार नाही. वन्यजीव टिकले तरच जंगले टिकतील, जंगले टिकली तरच पर्यावरण सुरक्षित राहील आणि पर्यावरण सुरक्षित राहिले तरच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील. म्हणूनच "वन्यजीव वाचवा, निसर्ग वाचवा आणि मानवजातीचे अस्तित्व सुरक्षित ठेवा."

**-डॉ. प्रीतम गेडाम**

## बदलते तंत्रज्ञान

# 'या' भारतीय कंपनीची आता स्मार्टफोन बाजारात एन्ट्री

भारतीय स्मार्टफोन बाजारात एका नवीन ब्रँडची एन्ट्री झाली आहे. वेअरेबल डिव्हाइस उत्पादक Fire-Boltt ने स्मार्टफोन सेगमेंटमध्ये पदार्पण केले असून, Boltt ब्रँडअंतर्गत आपले पहिले दोन स्मार्टफोन येत्या २५ ऑगस्ट रोजी लॉन्च करणार आहे. हे दोन्ही स्मार्टफोन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म फ्लिपकार्टवर विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत.



Fire-Boltt कंपनी Boltt Evo ४G आणि Boltt Ace ५G या दोन मॉडेल्ससह स्मार्टफोन बाजारात प्रवेश करणार आहे. यापूर्वी हे दोन्ही स्मार्टफोन विविध सर्टिफिकेशन वेबसाइट्सवर दिसले होते. मात्र, कंपनीने अद्याप त्यांच्या संपूर्ण फीचर्सची अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही. फ्लिपकार्टवरील टीझरनुसार, २५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता कंपनीचा पहिला स्मार्टफोन अधिकृतपणे सादर केला जाईल.

### क्लीन सॉफ्टवेअरचा दावा

फ्लिपकार्ट लिस्टिंगमध्ये कंपनीने दावा केला आहे की, हे दोन्ही स्मार्टफोन क्लीन सॉफ्टवेअर अनुभवासह येतील. त्यामुळे युजर्सना कोणत्याही अनावश्यक ॲप्सशिवाय अधिक वेगवान आणि स्मूथ परफॉर्मन्स मिळेल.

### डिझाइनची पहिली झलक

कंपनीने फोनच्या फ्रंट डिझाइनची झलकही दाखवली आहे. यात तुम्हाला सेंटर-अलाइन पंच-होल डिस्प्ले, डिस्प्लेभोवती जाड बेझल्स आणि उजव्या बाजूला पॉवर बटण आणि व्हॉल्यूम बटणे मिळतील. हे दोन्ही स्मार्टफोन बजेट सेगमेंटसाठी लॉन्च होण्याची शक्यता आहे.

### Evo ४G\चे संभाव्य फीचर्स

Boltt Evo ४G स्मार्टफोन अलीकडेच Geekbench वर दिसला होता. लिस्टिंगनुसार, या फोनमध्ये Unisoc T७२५० प्रोसेसर, ४GB RAM आणि Android १६ ऑपरेटिंग सिस्टम मिळू शकते. तर, परफॉर्मन्स चाचणीत या फोनला सिंगल-कोर स्कोअर ४४० आणि मल्टी-कोर स्कोअर १,४७० मिळाला आहे.

### Lavaशी थेट स्पर्धा

भारतीय स्मार्टफोन ब्रँड Lava ने नुकतीच Virat V१ सिरीज लॉन्च केली आहे. या मालिकेत कंपनीने ४G आणि ५G असे दोन स्मार्टफोन सादर केले असून, त्यामध्ये ६,०००mAh बॅटरी देण्यात आली आहे. या मालिकेची सुरुवातीची किंमत ₹८,९९९ आहे. Lava Virat V१ ४Gमध्ये Unisoc SC९८६३A चिपसेट आणि IP६४ रेटिंग देण्यात आले आहे.

# भारताच्या माजी परराष्ट्रमंत्री स्व. सुषमा स्वराज



**निमित्त**

आपलं वकृत्व, इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, प्रभावी नेतृत्व कौशल्य, भाजपचा आक्रमक, पण संयत चेहरा अशी ओळख असलेल्या सुषमा स्वराज यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९५३ रोजी हरियाणातील अंबाला छावणी परिसरात झाला होता. त्यांचे वडील हरदेव शर्मा यांच्यामुळे सुरुवातीपासूनच त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित होत्या. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून त्यांच्या आंदोलनात्मक आणि राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

स्वराज यांनी १९७३मध्ये सर्वोच्च न्यायालयात आपल्या वकिलीला सुरुवात केली. त्यावेळी जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात लादलेल्या आणीबाणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयात वकिली करणारे स्वराज कौशल यांच्याशी सुषमा यांची ओळख झाली. या ओळखीचं रुपांतर मैत्रीत आणि मैत्रिचं पुढे प्रेमात झालं. १९७५मध्ये या दोघांनी विवाह केला. स्वराज कौशल हे जॉर्ज फर्नांडिस यांचे सहकारी होते. त्यामुळे सुषमा स्वराजही पुढे फर्नांडिस यांच्या चळवळीची कायदेशीर बाजू सांभाळू लागल्या. इतकंच नाही तर आणीबाणीच्या काळात गाजलेल्या बडोदा डायनाईट प्रकरणात जॉर्ज यांचा बचाव करणाऱ्या वकिली समुहात सुषमा स्वराज यांचाही समावेश होता. पुढे पती स्वराज यांनी आपली वकिली कायम ठेवली तर आणीबाणीनंतर त्या भाजपमध्ये दाखल झाल्या. १९७७ मध्ये वयाच्या अवघ्या २५व्या वर्षी त्या हरियाणातून आमदार आणि मंत्रीही बनल्या. पुढे त्यांनी राष्ट्रीय राजकारणात प्रवेश केला आणि कधीही मागे वळून पाहिले नाही.


मोदी सरकारच्या पहिल्या टर्ममध्ये सुषमा स्वराज यांच्यावर परराष्ट्र खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्यांनी परराष्ट्र मंत्रालयासारखं खातं लोकाभिमुख केलं. परराष्ट्र मंत्री असताना स्वराज अवघ्या एका ट्विटच्या माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या भारतीयांना मोलाची मदत केली. तुम्ही जगात कुठेही असा, तुमचा देश तुमच्या मदतीसाठी तत्पर आहे, अशी भावना स्वराज यांनी परदेशात असलेल्या भारतीयांच्या मनात निर्माण केली होती. इतकंच नाही तर स्वराज यांनी पासपोर्ट लवकर मिळावा म्हणून जी ऑनलाईन सुविधा सुरु केली. तो अगदी महत्वपूर्ण निर्णय ठरला, ज्यामुळे अनेकांचे पासपोर्टच्या अडचणी संपल्या. याचसाठी त्यांनी मोबाईल ॲपदेखील आणले.

महाराष्ट्रातील निवृत्त अधिकारी असलेल्या कुलभूषण जाधव यांना पाकिस्तानने अटक केल्यानंतर सुषमा स्वराज यांनी ज्या पद्धतीने काम केले. ते महत्त्वाचे ठरले. याच प्रकरणात त्यांनी हरीश साळवे यांना आंतरराष्ट्रीय न्यायालयात भारताची बाजू मांडण्यात पाठवले. ज्याचा फायदा झाला तसंच परदेशात अडकलेल्या अनेक भारतीय लोकांना त्यांनी ज्या प्रकारे तत्परतेने मदत केली. ती नक्कीच वाखाणण्याजोगी राहिली.

याचबरोबर चुकून पाकिस्तानात पोहोचलेली दिव्यांग युवती गीता १० वर्षानंतर सुषमा स्वराज यांच्या प्रयत्नाने भारतात परतली होती. २६ ऑक्टोबर २०१५ रोजी जेव्हा गीता भारतात परतली तेव्हा तिचा भारत की बेटी असा उल्लेख स्वराज यांनी केला होता. इतकंच नाही तर त्यांनी गीताच्या आई-वडिलांच्या शोधासाठी १ लाख रुपयांचं बक्षीसही जाहीर केलं होतं.

सुषमा स्वराज यांनी आजारपणामुळे २०१९ची निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्या सक्रीय राजकारणापासून दूर झाल्या. असं असलं तरी काश्मीरमधील ३७० कलम रद्द केल्यानंतर त्यांनी भाजप सरकारच्या निर्णयाचं स्वागत केलं. पुढे ६ ऑगस्ट २०१९ रोजी वयाच्या ६७व्या वर्षी दिल्लीतील एम्स रुग्णालयात उपचार सुरु असताना कार्डिॲक अरेस्टमुळे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यावेळी संपूर्ण भारत शोकाकुल झाला होता. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# मासिक पाळी पुढे ढकलण्यास गोळ्या घेतल्याने दुष्परिणाम

मासिक पाळी विलंब करणाऱ्या गोळ्या महिलांसाठी गेमचेंजर ठरल्या आहेत यात शंका नाही, पण या गोळ्यांचा दुष्परिणाम तुमच्या त्वचेवर होऊ शकतो तसेच अनेक आजार ओढावू शकतात. म्हणून या गोळ्या खाण्याआधी हा लेख वाचा!



मासिक पाळीला विलंब करणाऱ्या गोळयांमध्ये नोरेथिस्टेरॉनसारखेच सिंथेटिक होर्मोन्स असतात, ज्यामुळे शरीरातील एंड्रोजन (मेल हार्मोन्स)चे प्रमाण वाढवू शकतात. परिणामी सीबम उत्पादनात वाढ होते आणि त्वचेवरील छिद्र बंद होण्याची शक्यता असते; तथापि मुरुम येऊ शकतात, असे डॉ. एम रजनी, सल्लागार स्त्रीरोगतज्ज्ञ, केअर हॉस्पिटल्स, बंजारा हिल्स, हैदराबाद यांनी सांगितले.

मासिक पाळी विलंब करणाऱ्या गोळ्यांमुळे काही दुष्परिणामांनाही सामोरं जावं लागतं. या गोळ्यांमुळे शरीरात रक्ताच्या गुठळ्या होण्यासारखे दुष्परिणाम होऊ शकतात. या गोळ्यांचा दीर्घकाळ वापर केल्याने हार्मोन्समध्ये चढ-उतार होतात, ज्यामुळे मासिक पाळी अनियमित होते, असे डॉ. मानसी शर्मा, सल्लागार- प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल, खराडी यांनी सांगितले.

नॉरथिस्टेरॉनसारख्या मासिक पाळी विलंब करणाऱ्या गोळ्या घेतल्याने हार्मोनल पातळीत चढउतार होतो आणि त्यामुळे पिंपल्स येऊ शकतात. या गोळ्या घेतल्याने मासिक पाळीच्या वेळेस ओटीपोटात दुखल्याचे आणि रक्तस्त्राव वाढल्याचेही समोर आले आहे. ज्या स्त्रियांना हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आजार आहेत किंवा स्ट्रोकचा त्रास आहे किंवा ज्या धूम्रपान करतात, त्यांनी तोंडावाटे गर्भनिरोधक गोळ्या घेऊ नयेत, असे डॉ. शरीफा चाऊस, त्वचाविज्ञानी आणि कॉस्मेटोलॉजिस्ट, शरीफा स्किन केअर क्लिनिक यांनी सांगितले.

या गोळ्यांमुळे हार्मोनल असंतुलन निर्माण होते, ज्यामुळे नैसर्गिक हार्मोनल चक्रात व्यत्यय येतो तसेच मूड बदलणे, वजन वाढणे किंवा गोळ्या बंद केल्यावर अनियमित मासिक पाळी येणे अशा दुष्परिणामांबाबत डॉ. एम. रजनी यांनी सांगितले. या गोळ्यांमुळे रक्ताच्या गुठळ्यांचा त्रास आधीपासून असलेल्या किंवा धूम्रपान करणाऱ्या महिलांमध्ये रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका किंचित वाढला आहे. कॉमन साईड इफेक्ट्समध्ये स्तनाची कोमलता आणि डोकेदुखी यांचा समावेश होतो. याशिवाय दीर्घकालीन वापरामुळे यकृताच्या कार्यावर परिणाम होतो. त्यामुळे अशा गोळ्या खाण्यापूर्वी महिलांनी विचार केलेला बरा!

# रायगड उत्तर विभाग युवा महोत्सवात १८०० विद्यार्थ्यांचा सहभाग





## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात उत्कृष्ट कलाविष्कार

महोत्सवात कर्जत, खालापूर, उरण व पनवेल तालुक्यातील ३०हून अधिक महाविद्यालयांतील सुमारे १८०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ललित कला, साहित्य, संगीत, नृत्य व नाट्य विभागांतील ३२ विविध स्पर्धांत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कलाविष्कार सादर करीत आपल्या सर्जनशीलतेची आणि प्रतिभेची प्रभावी छाप पाडली. दिवसभर महाविद्यालय परिसरात उत्साह, सांस्कृतिक वैविध्य आणि स्पर्धेचे सकारात्मक वातावरण अनुभवायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थित मान्यवरांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

**खारघर : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत आयोजित ५९व्या युवा महोत्सवाच्या रायगड उत्तर विभाग (झोन-७) च्या पहिल्या विभागीय फेरीचे आयोजन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले.

युवा महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, संस्थेचे सदस्य राहुल घरत, डॉ. सुनील पाटील (संचालक, विद्यार्थी विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ), निलेश सावे (सांस्कृतिक समन्वयक, मुंबई विद्यापीठ), उत्तर रायगड जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. पराग कारूळकर, सहसमन्वयक प्रा. डॉ. दीपक गायकवाड, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीशा नायर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले तसेच मान्यवरांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांची पुढील विद्यापीठस्तरीय फेरीसाठी निवड करण्यात आली. रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असलेल्या रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने चालू वर्षी युवा महोत्सवाचे उत्कृष्ट नियोजन व यशस्वी आयोजन करून आपली संघटन क्षमता सिद्ध केली. यावेळी विविध कला स्पर्धांचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने क्लासिकल इन्स्ट्रुमेंटल सोलो तालवाद्य -प्रथम क्रमांक वीर वाजेकर कॉलेज व अभिनव ज्ञानमंदिर कॉलेजकर्जत या महाविद्यालयांनी पटकाविला. इंडियन लाईट होकल सोलो-प्रथम क्रमांक महात्मा फुले कॉलेज पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. इंडियन ग्रुप साँग-प्रथम क्रमांक चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. वेस्टर्न ग्रुप साँग-प्रथम क्रमांक पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स सायन्स न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. वेस्टर्न होकल सोलो प्रथम क्रमांक-पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स सायन्स न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला.

इंडियन फोक डान्स-प्रथम क्रमांक चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. वक्तृत्व स्पर्धा ग्रुप ए-प्रथम क्रमांक बीसीटी लॉ कॉलेज न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. वक्तृत्व स्पर्धा बी-प्रथम क्रमांक एमजीएम कॉलेज कळंबोली महाविद्यालयाने पटकाविला. वादविवाद स्पर्धा ग्रुप ए मराठी-चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. वादविवाद स्पर्धा ग्रुप बी-प्रथम क्रमांक उरण कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स उरण या महाविद्यालयाने पटकाविला. स्टोरी टेलिंग ग्रुप ए प्रथम क्रमांक-चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. स्टोरी टेलिंग ग्रुप बी-प्रथम क्रमांक चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. वन ॲक्ट प्ले ग्रुप ए-प्रथम क्रमांक पिल्लई कॉलेज ऑफ इंजीनियरिंग न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. वन ॲक्ट प्ले ग्रुप सी-प्रथम क्रमांक पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स सायन्स न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. स्किट ग्रुप ए प्रथम क्रमांक-चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. मोनो ॲक्ट ग्रुप ए-प्रथम क्रमांक बीसीटी लॉ कॉलेज न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला. मोनो ॲक्ट ग्रुप सी-प्रथम क्रमांक चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल या महाविद्यालयाने पटकाविला तसेच माईम-प्रथम क्रमांक रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर या महाविद्यालयाने पटकाविला.

संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, कार्यकारी मंडळ सदस्य नगरसेवक परेश ठाकूर तसेच विश्वस्त मंडळ आणि व्यवस्थापन समिती यांनी या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे अभिनंदन केले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या, उत्तर रायगड जिल्हा समन्वयक व सहसमन्वयक प्रा. तनुजा सुमन, सांस्कृतिक विभागातील सर्व सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विद्यार्थी तसेच सर्व स्वयंसेवकांनी परिश्रमपूर्वक योगदान दिले.

युवा महोत्सवाच्या या विभागीय फेरीने विद्यार्थ्यांना आपली कला आणि कौशल्य सादर करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. या यशस्वी आयोजनामुळे उत्कृष्ट नियोजनाबद्दल सहभागी विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

---

अ‍ॅड. आशा अरुणकुमार भगत
मोबाईल ८१०८३५५०००

### जाहीर नोटीस
### पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र. १०९६/२०२६
ने.ता. ०७/०९/२६
निशाणी क्रमांक ७

श्री. प्रविण प्रभाकर तांबे
वय ४७ वर्षे, धंदा - नोकरी
राहणार मानसरोवर कॉम्प्लेक्स को.हौ.सो.लि.
बिल्डींग नंबर ७ -बी, रुम नंबर ४०२
जुई रोड सेक्टर ३४ कामोठे पनवेल, महाराष्ट्र ४१०२०६
मोबाईल क्र. ९२२२२६०७००

सदरहु अर्जदार यांची आई कै. चंद्रप्रभा प्रभाकर तांबे हि दिनांक २३/०२/२०२५ रोजी मौजे एम.जी.एम कामोठे येथे मयत झाली आहे. कै. चंद्रप्रभा प्रभाकर तांबे यांच्या पश्चात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. कै. चंद्रप्रभा प्रभाकर तांबे यांचे पती कै. प्रभाकर कृष्णा तांबे हे दिनांक १४/११/१९७८ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. सबब कै. चंद्रप्रभा प्रभाकर तांबे यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहु अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :-

**मयत कै. चंद्रप्रभा प्रभाकर तांबे यांची वंशवेल येणेप्रमाणे :-**

कै. चंद्रप्रभा प्रभाकर तांबे (मुळ मयत स्त्री)
↓
कै. प्रभाकर कृष्णा तांबे (मुळ मयत स्त्रीचे पती )
↓
श्री. प्रविण प्रभाकर तांबे (मुळ मयत स्त्रीचा मुलगा )

कै. चंद्रप्रभा प्रभाकर तांबे यांच्या मृत्युसमयी त्यांच्या मालकीची व ताबेकब्जातील व त्यांच्या नावाची नोंद असलेल्या मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मौजे कामोठे तालुका. पनवेल येथिल सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंटचे नाव व सदनिका क्रमांक | बाजार मुल्य अंदाजे |
|---|---|
| बिल्डींग नंबर ७ बी रुम ४०२, मानसरोवर कॉम्प्लेक्स को हौ सो लि. प्लॉट क्रमांक १, २, ४, ५, ६, १९, २०, २२, २३, २४, २५, २६ सेक्टर ३४, कामोठे तालुका पनवेल ४१०२०९ | ४५,००,०००/- |

सदरहू सदनिका कै. चंद्रप्रभा प्रभाकर तांबे यांच्या नावे होती व ती व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे सदनिका आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै चंद्रप्रभा प्रभाकर तांबे यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर सदनिका हस्तांतरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये हया कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत. वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस दि. ०५/०८/२६ आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

सही/-
व.लिपीक दि.न्या. व स्तर

शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक (प्रशासन)
दि.न्या. व स्तर पनवेल

---

### खोपोली नगरपरिषद, जि. रायगड
### जाहीर खरेदी सूचना

जावक क्र. केएमसी/ नगररचना / १९२० दि. ०४/०८/२०२६

खोपोली नगरपरिषद हद्दीतील मौजे समर्थनगर शिळफाटा खोपोली, ता. खालापूर जि. रायगड सर्व्हे नं. २८/अ/३/४/ई/२, हि.नं. २, सि.स.नं. २१०४, क्षेत्र ५७३.७२ चौ.मी. श्री. हुसेन सुलेमान पाटील या खातेदार यांनी धारण केलेली जमीन खोपोली शहर विकास योजने अंतर्गत ९.०० मी. डी.पी. रस्त्यामध्ये बाधीत होत आहे. ज्याअर्थी सदर जमिनीच्या नगरपरिषदेस हस्तांतरणासाठी जमिनीचा मोबदला टी.डी.आर. स्वरुपात जमिन मालक / खातेदार यांना मान्य असुन सदर जमिनीबाबत खोपोली नगरपरिषद संबंधित जागा मालक यांचे समवेत खरेदीखत करत आहे. सबब सदर बाबत कोणाची सुचना-हरकत असल्यास सदरची खरेदी सुचना प्रसिद्ध झालेचे दिनांकापासुन आठ दिवसाचे आत या कार्यालयाकडे लेखी सूचना-हरकत नोंद करावी. त्यानंतर आलेल्या सुचना हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दिनांक : ५/०८/२०२६

**सही /-**
**(डॉ. पंकज पाटील)**
मुख्याधिकारी तथा नियोजन
प्राधिकारी खोपोली नगरपरिषद

---

### जाहीर नोटीस

तमाम लोंकास कळविण्यात येते की १. श्री. आत्माराम बाळाराम हातमोडे व २. श्री. प्रदीप बाळाराम हातमोडे, सज्ञान राहणार - गिरवले, ता. पनवेल, जि. रायगड. यांच्या खुद्द मालकीची, ताबेकब्जात व वहीवाटीतील शेतजमीन असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - गिरवले, ता. पनवेल, जि. रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे / हिस्सा नं. | भो. वर्ग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| गिरवले/ पनवेल | ११८/ ब | १ | ०-५०-३० पो.ख. ०-०४-८० | १४.६२ पैसे |
| | | | **एकुण क्षेत्र** ०-५५-१० | |

वरील शेत जमीन ही आमच्या अशिलांनी वरील इसमाकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, या शेत जमिनीचा व्यवहार आमच्या अशिलांनी केला असून सदर व्यवहार हा वरील इसमावर बंधनकारक आहे व सदर कराराची पूर्तता वरील इसमानी करून देणे त्यांचेवर बंधनकारक आहे. तत्पूर्वी सदर कराराची पूर्तता करणे, तसेच सदर जमिन विकण्यापूर्वी ती निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखकी असणे आवश्यक आहे. जर सदरहू शेत जमिनीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एकवीस (२१) दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी पत्रानिशी व पुराव्यासह कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू शेत जमिनीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल यांची नोंद घ्यावी, कळावे.

दिनांक ०५/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. सागर भालचंद्र वाणी**

पत्ताः- ऑफीस नं ५०६, पाचवा मजला, मुनोत वास्तु एक्झोटीका कमर्शियल, प्रांत ऑफीस समोर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६. मो. नं. ९८२१५००००२

---

## सार्वजनिक शौचालयात अल्पवयीन मुलीसोबत केले अश्लील चाळे

### तरुणाला अटक

**नवीन पनवेल : वार्ताहर**

सफाई कर्मचाऱ्याने सार्वजनिक शौचालयात १० वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी २४ वर्षीय तरुणाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

पीडित १० वर्षीय मुलगी मंगळवारी (दि. ४) दुपारच्या सुमारास वाल्मिकनगर परिसरात खेळत होती. यावेळी आरोपीने तिला हातवारे इशारे करून जवळच असलेल्या महिलांच्या सार्वजनिक शौचालयात नेले आणि दरवाजा लावून घेतला. त्यानंतर तिच्यासोबत अश्लील चाळे केले.

यावेळी तेथे असणाऱ्या नागरिकांनी हे पाहिले आणि दरवाजा वाजवून पीडित मुलीला आणि आरोपीला बाहेर काढले. नागरिकांनी आरोपीला चोप देत पनवेल शहर पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

---

**CHANGE OF NAME**

I the undersigned **YAKUB ASGARALI CONTRACTOR** (Old name) residing at Sadabahar Nursary, Rosa Villa, College Road, At Karanjade, Panvel, Raigad, - 410206.

I Changed my Name by Gazzett No. M 22236931 Dated March 16 - 22, 2023. So that I remitter issue may here after be called by new name **YAKUB ASGARALI URF BOHARI CONTRACTOR**

Sign. by New Name

**YAKUB ASGARALI BOHARI URF CONTRACTOR**
Address : Sadabahar Nursary, Rosa Villa, College Road, At Karanjade, Panvel, Raigad, - 410206.

*वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी*
राम प्रहर

---

## नफ्याचे आमिष दाखवून फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेअर मार्केटमध्ये नफ्याचे आमिष दाखवून २० लाख एक हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी प्रेमसिंग नेगी हे सेक्टर १९, कामोठे येथे राहतात. अज्ञात इसमांनी त्यांना "बेरिंग्स इन्व्हेस्टमेंट" या व्हॉट्सअॅप ग्रुपला जॉईन केले. त्यानंतर त्यांना शेअर मार्केटमध्ये जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि एक लिंक पाठवली. त्या लिंकवरून डिमॅट खाते उघडण्यास सांगून वेगवेगळ्या बँक खात्यांची माहिती दिली. आयपीओमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून फिर्यादीकडून एकूण २० लाख एक हजार रुपये जमा करून घेतले. पैसे गुंतवूनही त्यांना परतावा न मिळाल्याने आणि आरोपींनी पैसेही परत न केल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

---

### पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.२४५/२५८/२०२६ दिनांक : ५/०८/२०२६

**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/37/ 2026-27 | पनवेल महानगरपालिका मुख्यालयातील दुसऱ्या मजल्यावरील मा. महापौर यांचे दालनाचे नूतनीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु.२०,९०,९९४/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ०६/०८/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
अतिरिक्त आयुक्त -।
पनवेल महानगरपालिका

---

### महाराष्ट्र शासन
### सहकार विभाग
### जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग कार्यालय

काँग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, तळमजला, महर्षी कर्वे रोड, अलिबाग जि. रायगड पिन कोड ४०२२०१
Email ID : ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/कात-४/अपसेटप्रा./नोटीस/कमळ महिला पत संस्था / सन २०२६/१४६७

**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७(११) अन्वये नोटिस**

विशेष वसुली अधिकारी,
कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी, पनवेल
६२६ अे / ७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारुती मंदिरा शेजारी, टिळक रोड, पनवेल जि. रायगड
......... **अर्जदार**

**विरूध्द**

१. श्री. शफी मोहम्मद युसुफ पठाण,
रा.एच.एम.एस. कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं. ३ रुम नं.१/२, खोपोली, शिळफाटा, ता.खालापूर, जि.रायगड
२. श्री. विशाल श्रीपती जाधव,
रा. सोमजाई वाडी, ओल्ड पनवेल, ता.पनवेल, जि. रायगड
३. श्री. निलोफर रियाज पठाण,
रा.एच.एम.एस. कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं. ३ रुम नं.१/२, खोपोली, शिळफाटा, ता. खालापूर, जि. रायगड
........... **प्रतिवादी**

अर्जदार पतसंस्थेकडून प्रतिवादी यांनी घेतलेले कर्ज थकीत झालेमुळे सदर संथेने प्रतिवादी यांचेविरुध्द प्राप्त केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अंतर्गत वसुलीचे प्रमाणपत्राची अंमलबजावणी अर्जदार संस्थेचे वसुली अधिकारी यांचे मार्फत करण्यात येत असून त्याकरीता संबंधित वसुली अधिकारी यांनी खालील मालमता जप्त करुन सदर मालमत्तेची जाहिर लिलावाने विक्री करणेसाठी सदर मालमत्तेचे मुल्य रक्कम ही वाजवी किंमत / अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता देण्याचा प्रस्ताव दाखल केला आहे.

| अ.क्र. | मालमता मालकाचे नाव | मालमत्ता स्थळ | मालमता वर्णन/ तपशिल | शासकीय दराने मुल्य | बाजारभाव दराने मुल्य | डिस्ट्रेस मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. शफी मोहम्मद युसुफ पठाण | मौजे शिळफाटा ता. खालापूर, जि. रायगड | मौजे शिळफाटा ता. खालापूर जि.रायगड येथील फ्लॅट नं.१ आणि २, तळमजला, एचएमएस कॉम्लेक्स, बिल्डींग नं.३, सर्वे नं. २६ अे,हिस्सा नं.२, सिटीएस नं. २१४८, क्षेत्र ८०.९९ चौ.मि. | २७,८७,१९०/- | २६,६६, ३०७/- | २३,९९,९७६/- |

मालमत्ताधारक आणि त्यातील हितसंबंधी यांनी सदर रकमेस वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता का देण्यात येवू नये? याबाबत प्रतिवादी यांना म्हणणे मांडण्यासाठी दि. ०४/०८/२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती, सदर सुनावणीस हजर राहण्याकरीता कर्जदार व जामिनदार यांना रजिस्टर पोस्टाने नोटीस बजावण्यात आलेली होती, मात्र ते हजर न राहील्याने त्यांच्या निदर्शनास येण्याकरीता त्यांना पेपर नोटीसीव्दारे कर्जदार व जामिनदार यांना संधी देण्यात येत आहे. तरी त्यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर दिनांक २०/०८/२०२६ रोजी ११.३० वा. आवश्यक पुराव्यासह उपस्थित रहावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून आपले गैरहजेरीत सुनावणी कामकाज पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- ०४/०८/२०२६

शिक्का

**सही/-**
**(तनवीर पाटील)**
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग

---

## शेतकऱ्यांसाठी पीकविमा मुदतवाढ

**रायगड, अलिबाग : जिमाका**

उत्पादन आधारित सुधारित प्रधानमंत्री पीकविमा योजना खरीप २०२६ व रब्बी हंगाम २०२६-२७ एक वर्षाकरिता अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. योजनेत सहभागाची अंतिम मुदत ३१ जुलै होती. त्यानंतर ती वाढवून १० ऑगस्ट करण्यात आली आहे.

---

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २६/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | विळे-भागड औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.... साजे जॅकवेल येथील अशुद्ध जलउदंचन केंद्रात एसव्हीजी पॅनेलचा पुरवठा करून बसविणे. | ₹३५,५०,०५६.०० |
| २ | पाताळगंगा येथील नवीन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... पाताळगंगा येथील अशुद्ध जलउदंचन केंद्रामध्ये ॲक्सेसरीजसह २५ अश्वशक्ती क्षमतेचा सबमर्सिबल पंपचा पुरवठा करणे. | ₹४०,३२,८००.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०७/०८/२०२६ ते दिनांक २१/०८/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ११/०८/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १७/०८/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# वाढदिवस अभीष्टचिंतन...!





# रायगडात १२,६८२ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा दिलासा

## पहिल्या टप्प्यात ७,५४४ जणांना होणार लाभ



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून जिल्ह्यातील १२ हजार ६८२ पात्र शेतकऱ्यांची माहिती योजना पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात सात हजार ५४४ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

दरम्यान, अद्याप केवळ एक हजार ९८० शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून उर्वरित पात्र लाभार्थ्यांनी विलंब न करता ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

शासनाने ९ जून २०२६ रोजी सर्व व्यापारी बँकांना अनुत्पादित (एनपीए) कर्जखात्यांवर आवश्यक त्या प्रमाणात 'हेअरकट' सवलत देण्याचे निर्देश दिले आहेत तसेच १ जुलै २०२६ पासून योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर कोणतेही अतिरिक्त व्याज आकारू नये, असेही आदेश बँकांना देण्यात आले आहेत. त्यामुळे गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या यादीतील थकबाकी व पोर्टलवरील थकबाकीत तफावत आढळल्यास योजना पोर्टलवरील रक्कमच ग्राह्य धरावी आणि शेतकऱ्यांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार टाकू नये, असे शासनाने स्पष्ट केले आहे.

सध्या जाहीर करण्यात आलेल्या यादीत दोन लाख रुपयांपर्यंत थकबाकी असलेल्या कर्जखात्यांचा समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेली तसेच उर्वरित पात्र कर्जखाती पुढील टप्प्यात प्रसिद्ध होणाऱ्या याद्यांमध्ये समाविष्ट करून त्यांनाही योजनेचा लाभ दिला जाणार आहे. योजनेचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे जिल्हा प्रशासनाने आवाहन केले आहे.

याशिवाय शासनाच्या निर्णयानुसार वेळेत पीककर्जाची परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या बँकेशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी.

रायगड जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयीकृत, खासगी, ग्रामीण व सहकारी बँकांना आपल्या खातेदार शेतकऱ्यांना योजनेची माहिती देऊन आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि आवश्यक माहिती अद्ययावत करण्यासाठी सक्रिय सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सर्व महा-ई-सेवा केंद्रे आणि कॉमन सर्व्हिस सेंटर यांनी आधार प्रमाणीकरणाची सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून द्यावी. या प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क आकारल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

योजनेसंदर्भातील अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग किंवा संबंधित तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा. रायगडातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी वेळेत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून शासनाच्या या महत्त्वाकांक्षी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील यांनी केले आहे.

# माथेरानचा वीजपुरवठा वारंवार खंडित

## भाजप शहराध्यक्ष सकपाळ यांचे महावितरणला निवेदन



**माथेरान : प्रतिनिधी**

पर्यटननगरी माथेरानमध्ये सातत्याने खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांसह व्यापारी आणि पर्यटकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या या समस्येकडे नगरसेवक तथा भाजप शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ व पदाधिकाऱ्यांनी महावितरणचे लक्ष वेधत मुख्य अभियंता संजय पाटील व संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले.

या निवेदनात माथेरानच्या भौगोलिक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेत येथील वीजपुरवठ्याच्या अनेक अडचणींची माहिती देण्यात आली. माथेरान हे जागतिक स्तरावर प्रसिद्ध पर्यटनस्थळ असून वर्षभर देश-विदेशातील पर्यटक येथे मोठ्या संख्येने भेट देतात. विशेषतः पावसाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी होत असते, मात्र नेमक्या याच काळात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने हॉटेल, लॉज, व्यावसायिक प्रतिष्ठाने आणि इतर पर्यटन व्यवसायांवर मोठा परिणाम होत आहे तसेच पाणीपुरवठा यंत्रणाही विजेवर अवलंबून असल्याने पाणीटंचाईची समस्याही निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

माथेरानमध्ये शेती अथवा अन्य कोणतेही मोठे उत्पन्नाचे साधन नसून पर्यटन हाच येथील नागरिकांचा प्रमुख उदरनिर्वाहाचा आधार आहे. त्यामुळे वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याचा थेट फटका स्थानिक अर्थव्यवस्थेला बसत असल्याचे सकपाळ यांनी निदर्शनास आणून दिले तसेच पर्यटकांनाही मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असून स्थानिक अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही त्याकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

निवेदनात अनेक महत्त्वाच्या मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे. शहरातील अनेक ठिकाणी भुयारी वीज केबल नादुरूस्त असून त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, ट्रान्सफॉर्मरना संरक्षण कवच उपलब्ध करून द्यावे, माथेरानसाठी स्वतंत्र देखभाल (मेंटेनन्स) व्हॅन उपलब्ध करावी, वाढीव तांत्रिक कर्मचारी नियुक्त करावेत, ग्राहक तक्रार निवारण केंद्र माथेरानमध्येच सुरू करावे, महावितरणची जीर्ण झालेली इमारत तातडीने दुरुस्त करून कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था करावी अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. कर्मचारी माथेरानमध्ये वास्तव्यास राहिल्यास तांत्रिक बिघाड तातडीने दूर करणे शक्य होईल आणि वीजपुरवठा अधिक कार्यक्षम व सुरळीत ठेवता येईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

या सर्व मागण्यांबाबत मुख्य अभियंता संजय पाटील आणि संबंधित अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाली असून माथेरानच्या वीज समस्यांवर लवकरच ठोस उपाययोजना केल्या जातील, अशी अपेक्षा नगरसेवक प्रवीण सकपाळ यांनी व्यक्त केली.

# एकाच वेळी १६० अराजपत्रित अधिकाऱ्यांना राजपत्रित पदावर पदोन्नती



**अलिबाग : प्रतिनिधी**

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी व मुद्रांक विभागात ऐतिहासिक निर्णय घेत एकाचवेळी १६० वर्ग-३ अराजपत्रित अधिकाऱ्यांना वर्ग-२ राजपत्रित पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली पदोन्नती प्रक्रिया पूर्ण झाल्याने कर्मचाऱ्यांच्या मनोबलात वाढ झाली आहे.

या निमित्ताने अलिबाग येथे आयोजित कार्यक्रमात नोंदणी व मुद्रांक विभाग अराजपत्रित अधिकारी व कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार करण्यात आला. संघटनेचे राज्याध्यक्ष रविराज सुपेकर, रायगड जिल्हाध्यक्ष विक्रांत आंब्रस्कर यांच्यासह इतर पदाधिकारी व सभासद यावेळी उपस्थित होते.

सत्कारप्रसंगी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले आणि कर्मचाऱ्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा केली.

मंत्री बावनकुळे यांनी पदोन्नती मिळालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी सर्वांनी अधिक मेहनतीने काम करावे, असे आवाहन केले. नोंदणी व मुद्रांक विभागातील सेवा नागरिकाभिमुख करण्यावर भर देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या एकरकमी पदोन्नतीमुळे राज्यातील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या कामकाजाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पाच्छापूर विद्यालयात कथाकथन स्पर्धा



**पाली : प्रतिनिधी**

श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाच्छापूर माध्यमिक विद्यालय येथे गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याच्या उद्देशाने कथाकथन स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. स्पर्धेत इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रेरणादायी गुरु-शिष्य कथा प्रभावीपणे सादर केल्या.

स्पर्धेत इयत्ता आठवीतील प्राजक्ता हंबीर, वर्षा वारगुडे, वृषाली वाक, निशांत कोकरे, तेजस मेंगाळ, नववीतील सुप्रिया बरगे, कटरीना शीद, प्रेम बरगे तसेच इयत्ता दहावीतील मीना सरकार, योगिता हंबीर, जयश्री बरगे, भारती कोकरे आणि रोहन कोकरे यांनी कथाकथनातून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी संत, महापुरुष आणि आदर्श गुरू-शिष्यांच्या प्रेरणादायी कथा सादर करत गुरुंबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली.

मुख्याध्यापक दीपक माळी यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक करत "गुरु हा केवळ ज्ञानदाता नसून जीवनाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांनी गुरुंचा आदर राखत वारसा जपावा," असे आवाहन केले.

यावेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सुचीर खाडे यांनी गुरुपौर्णिमेचे सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक महत्त्व उलगडून सांगितले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी दिव्या जंगम यांनी परिश्रम घेत विद्यार्थ्यांची उत्कृष्ट तयारी करून घेतली. कार्यक्रमास प्रल्हाद ओंबळे, संदीप डिंगळे, नारायण वारा, सारिका गायकवाड यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन इयत्ता नववीतील दर्शना बरगे, हेमाली फसाळ आणि जानवी वाघ यांनी केले.

# चौक येथे जुन्या पाईपचा लिलाव; रक्कम चार ग्रामपंचायतींना होणार वितरित



**चौक : प्रतिनिधी**

चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या प्रबोधनकार ठाकरे खुल्या नाट्यगृहात जुन्या पाणीपुरवठा योजनेच्या पाईपचा जाहीर लिलाव करण्यात आला. या परिसरात असा प्रथमच लिलाव झाल्याने परिसरातील लोक उपस्थित होते.

चौक ग्रुप ग्रामपंचायतीची स्थापना १० जून १९५१ रोजी झाली. अनेक महसूली गावे, आदिवासीवाडी, वस्ती व काही ठिकाणी अतिशय दुर्गम भागात होती. या ग्रामपंचायतीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली आहे. चौक ही मोठी ग्रामपंचायत असल्याने तिची विभागणी होऊन ५ नोहेंबर २०१४ रोजी तुपगाव, लोधीवली आणि आसरे ग्रामपंचायतींची निर्मिती झाली. त्यावेळी राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेचे चौक व तुपगाव ग्रामपंचायतीच्या आवारात होते. हे पाईप खराब होणे, सडण्याची प्रक्रिया सुरू झाली होती तसेच चोरीचे प्रमाण वाढले होते.

या पाईपचा सध्या तरी उपयोग नसल्याने व कुणाही एका ग्रामपंचायतीची मालकी नसल्याने चौक सरपंच रितू ठोंबरे, लोधीवली सरपंच पूजा तवले, तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार व आसरे सरपंच बळीराम जांभळे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणशी पत्रव्यवहार करून लिलाव प्रक्रिया घेण्यात आली. याची मूळ किंमत ११,८४,८५० रुपये होती, तर लिलावाची शेवटची बोली २३,८० हजार रुपे होऊन हा लिलाव मासिहुद्दीन मुकीमुल्लाह खान (कल्याण, शिळफाटा) यांना मिळाला.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे, महेश म्हसे, विश्वास वारे, गोकुळदास राठोड, माजी सरपंच शरीफ भालदार, पूजा हातमोडे, सुभाष पवार, निखिल मालुसरे, अजिंक्य चौधरी, सचिन साखरे, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. लिलावात आलेली रक्कम ही चारही ग्रामपंचायतींच्या लोकसंख्येनुसार विभागण्यात येणार आहे, अशी माहिती ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे व इतर तीन ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दिली.

# भर पावसात माथेरान हिल हाफ मॅरेथॉनचा उत्साह



**नेरळ : प्रतिनिधी**

रिलायबल हेल्थ फाउंडेशन (अंबरनाथ), रायगड पोलीस दल आणि नेरळ पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माथेरान हिल हाफ मॅरेथॉनने केवळ क्रीडा स्पर्धेपुरती मर्यादा न राहता समाजात मद्यमुक्ती, नशामुक्ती आणि अमली पदार्थविरोधी जनजागृतीचा प्रभावी संदेश दिला. माथेरानच्या निसर्गरम्य घाटात झालेल्या या उपक्रमात सुमारे ४०० धावपटूंनी सहभाग घेत व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प केला.

मुसळधार पाऊस, दाट धुके आणि निसरडा घाटमार्ग अशा आव्हानात्मक परिस्थितीतही नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी राहुल वरोटे यांनी स्वतः रस्त्यावर उभे राहून संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेवर लक्ष ठेवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्येक वळणावर बंदोबस्त ठेवत धावपटूंची सुरक्षितता, वाहन वाहतुकीचे नियोजन आणि आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी अत्यंत दक्षतेने पार पाडली.

सीमा रिसॉर्ट, माथेरान गेट, जुम्मापट्टी, दस्तुरी नाका आणि संपूर्ण घाटमार्गावर पोलीस यंत्रणा सतर्क होती. धावपटूंना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, पर्यटकांना सुरक्षित प्रवास करता यावा आणि घाटातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी पोलिसांनी भर पावसातही अविरत कर्तव्य बजावले. त्यामुळे संपूर्ण स्पर्धा कोणतीही अनुचित घटना न घडता यशस्वीरित्या पार पडली.

आजच्या तरुण पिढीला व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी मॅरेथॉनसारखे उपक्रम काळाची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. "रन फॉर हेल्थ... रन फॉर ड्रग-फ्री सोसायटी" हा संदेश स्पर्धेच्या माध्यमातून प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहचविण्यात आला.

# पोलादपूरमध्ये रानभाजी पदार्थ स्पर्धा



**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड येथील मणिरी वेस्ट मॅनेजमेंट फाउंडेशन आणि पोलादपूरच्या दिशा सांस्कृतिक ग्रुपचा संयुक्त उपक्रम असलेल्या रानभाजी पदार्थ स्पर्धांचे आयोजन येथील श्रीराम मंदिरात करण्यात आले. तालुक्यातील सुमारे ३५ महिलांनी सहभागी होऊन पाककृती सादर केल्या. जागर वसुंधरेचा... उत्सव रानभाज्यांचा या संकल्पनेतून ही आगळीवेगळी स्पर्धा महिलांच्या तुडुंब प्रतिसादात यशस्वी झाली.

यावेळी दिशा सांस्कृतिक ग्रुपच्या अध्यक्ष संगीता मोरे यांच्यासह सदस्य तसेच मणेरी वेस्ट मॅनेजमेंट फाउंडेशनच्या सदस्यांची उपस्थिती होती. फाउंडेशनच्या संस्थापक ममता मेहता यांनी वाढत्या कचरा समस्येवर प्रभावी उपाय म्हणून टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, सेंद्रिय खत, जीवामृत निर्मिती आणि पर्यावरणपूरक जीवनशैली या संदर्भात उहापोह करून मुलांना फास्टफूडऐवजी रानभाज्यांपासून तयार होणारे पौष्टिक पदार्थ खाण्याची सवय लावण्याचे आवाहन केले.

अमृत संस्थेचे शैलेश मराठे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत खुल्या प्रवर्गातील महिलांनाही योजनांचा लाभ व अनुदान उपलब्ध असल्याची माहिती दिली.

स्पर्धक महिलांनी रानभाज्यांपासून विविध पाककृती सादर केल्यानंतर आयोजकांनी त्यांचे परिक्षण केले. पदार्थाची बाह्य सजावट गटामध्ये रूपाली शाम लवंगारे प्रथम, तर पल्लवी सुभाष सागवेकर यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. पदार्थाची सजावट व संपूर्ण मांडणी गटात पूजा किर्तीश खोत यांना प्रथम, तर भक्ती भावेश सलागरे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. स्नेहल स्वराज गायकवाड यांच्या पाककृतीची तृतीय क्रमांकासाठी निवड करण्यात आली. चवीनुसार पारंपरिक पदार्थ गटात सखुबाई लक्ष्मण कासार प्रथम, तर प्रेमलता गणपत टोलमारे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. रानभाजीचा नाविन्यपूर्ण पदार्थ गटात पल्लवी संदेश शेठ प्रथम, तर रसिका गोपीचंद घाडगे द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या ठरल्या. उत्कृष्ट चव गटात मधुमती महादेव जंगम यांची पाककृती प्रथम, तर प्रणिता श्रीधर कासार दुसऱ्या क्रमांकाच्या पाककृतीच्या मानकरी ठरल्या.

विजेत्यांसह सर्व सहभागी महिला स्पर्धकांना प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देण्यात आली. स्पर्धेचे सूत्रसंचालन कलिका अधिकारी यांनी केले.

# खरीप हंगाम पीक स्पर्धेसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून पिकांची उत्पादकता वाढविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२६ अंतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीक स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. यंदापासून या स्पर्धेसाठी अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली असून पारदर्शक व गतिमान प्रशासनाच्या दृष्टीने स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले आहे.

राज्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांचा गौरव करून त्यांच्या अनुभवाचा लाभ इतर शेतकऱ्यांनाही व्हावा तसेच राज्याच्या कृषी उत्पादनात वाढ व्हावी या उद्देशाने कृषी विभाग दरवर्षी ही स्पर्धा आयोजित करतो. तालुका स्तरावरील स्पर्धेतील उत्पादकतेच्या आधारे जिल्हा व राज्यस्तरीय विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे.

अर्जासोबत फार्मर आयडी, प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, आदिवासी गटासाठी जात प्रमाणपत्र तसेच बँक खाते पासबुक किंवा धनादेशाच्या पहिल्या पानाची प्रत जोडणे आवश्यक आहे. भात व नाचणी पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील पीक स्पर्धा नोंदणीया टॅबद्वारे ऑनलाइन अर्ज करून या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुरूड जंजिरा कृषी कार्यालयाचे अधिकारी प्रमोद नरळे यांनी केले आहे.

